# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 19/09/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. अरोली :- अंतर्गत 15 किमी अंतरावर मौजा खात महालगाव ते खात रोड येथे दिनांक 18/09/2020 चे 05.00 वा. ते 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे – पो.हवा. भगवान चांदेवार हे पेट्रोलींग करीत असतांना त्यांना मिळालेल्या खबरेवरुन नाकाबंदी केली असता एम.एच– 40/बी.4– 3023 क्रमांकाच्या एल.पी.ट्रकला मौजा खात महालगाव ते खात रोड येथे थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी क्र. 1) रोशन खुशालजी कारेमोरे, वय 30 वर्ष, रा. नेरी याने एल.पी.ट्रक चा मालक आरोपी क्र. 2) शैलेश लक्ष्मण कावळे, वय 28 वर्ष, रा. अडयाळ याच्या सांगण्यावरुन त्याच्या ताब्यातील वाहनामध्ये महालगाव शिवारातील सुर नदी मधील रेती चोरुन वाहतूक करतांनी मिळून आले. सदर वाहनात विनापरवाना अवैधरित्या 10 ब्रास रेती कि. 20,000/–रू. व एल.पी. ट्रक कि. 10,00,000/–रू. असा एकुण कि. 10,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार भगवान चांदेवार यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राजेंद्र पुडके 9823331162 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. रामटेक :- अंतर्गत के के नगर वार्ड क 4 शितलवाडी येथे दिनांक 18/09/2020 चे 03:00 वा. ते 03. 30 वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रकाश हरीभाउ कळंबकर, वय 48 वर्ष, रा. के के नगर वार्ड क 4, शितलवाडी यांचे घरातील किचन जवळच्या रूमच्या खिडकीचे ग्रिल अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरामधील गोदरेज आलमारी मधील ड्रावर मध्ये ठेवलेले नगदी 2,000/–रू. चोरून नेतांना फिर्यादीला आवाज आल्याने सदर रूममध्ये गेले असता अज्ञात आरोपी खिडकीतुन पळुन जात असतांना दिसल्याने फिर्यादी हे खिडकीतुन डोकावुन त्याचेकडे पाहत असतांना अज्ञात आरोपीने फिर्यादीचे दिशेने गोटा फेकुन मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 336 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अडामे 9637400873 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 6 कि. मी. अंतरावर मौजा वारेगाव शिवार येथे दिनांक 17/09/2020 चे 22:00 वा. ते दिनांक 18/09/2020 चे 06.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– धनसिंग भागसिंग सिरोया वय 64 वर्षे, रूईगंज गुजरी बाजार कामठी यांचे शेतातुन अज्ञात आरोपीने 01) 03 गाय किंमती 24,000/–रू., 02) 02 बैल किंमती 16,000/–रू., 03) 17 बकरया किंमती 51,000/–रू., 04) 02 बकरे किंमती 8,000/–रू. असा एकुण 99,000/–रू. चा माल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. मेश्राम 97652 36916 हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– दिनांक 14/09/2020 चे 09:00 वा. ते दिनांक 15/09/2020 चे 08.00 वा. सुमारास अज्ञात आरोपीने वन्यजीव वनपरीक्षेत्र अभयारण्य उमरेड कऱ्हांडला कक्ष क्र 1418 मध्ये एक टॅप कॅमेरा एस एन 127918001610 किं 10,000/– रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हरीचंद्र विश्वनाथ शाहारे, वय 52 वर्ष, रा. भदवापुर ऑफिसर कॉलनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक हरीश यंगलवार 9423219429 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर